महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग मंत्रालय, मुंबई ४०००३२.
**क्रमांक :नविवि-२०२४/प्र.क्र.२३१/नवि-३,**
दुरध्वनी क्रमांक ०२२-२२८२०४५५
**दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४**

## सूचना

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथे वाहन चालक या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी एकूण २ कुशल कर्मचाऱ्यांची तसेच शिपाई या पदावर कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी एकूण १३ अकुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने किमान ५ वर्षे अनुभव असणाऱ्या मनुष्यबळ पुरविण्याऱ्या पात्र संस्था तसेच निविदेमधील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक पात्र नोंदणीकृत संस्थांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या.

०२. मनुष्यबळ पुरवठा करधाऱ्या कंत्राटदाराची निवड करण्याकरीता सह सचिव (आस्थापना), नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन करण्यात आली होती त्यानुषंगाने प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०७.१०.२०२४ रोजी निवड समिती समोर सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येऊन प्राप्त निविदांपैकी न्युनतम सेवा कर, संस्थेचा अनुभव, इतर प्रशासकीय संस्था/आस्थापना/विभाग यांच्या बरोबर आतापर्यंत केलेले करार संस्थेशी संबंधित आर्थिक बाबींचा ताळमेळ इत्यादी बाबी तसेच विहित अटी व शर्तीनुसार निवड समितीने **"गरुडझेप सेवा सहकारी संस्था मर्या.,सातारा"** यासंस्थेची निवड समितीस प्राप्त अधिकारांतर्गत नगर विकास विभागाकरीता कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करण्याकरीता निवड केली आहे.

सदर सूचना महाराष्ट्र शासनाच्या https://maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(देवानंद शे.महाजन)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

विभाग.docx C:\Users\suhas